पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३


सुविचार - आयुष्यातील सर्वात मोठी शिक्षा म्हणजे आपल्या चुकांमधून शिकणे.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स	७४,४५९.५३	+३०८.४९	+०.४२%
डॉलर	₹ ९४.९१		

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

	कमाल	किमान
जळगाव	३३	२१
दिल्ली	२७	१९
मुंबई	३४	२७
नागपूर	३१	२०
पुणे	३०	२०

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ | वर्ष २ रे | अंक ३५२ किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३० संध्या-५:५२

सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम)	चांदी (प्रति किलो)
१,३८,०००/-	१,७८,०००/-

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

थोडक्यात

महाराष्ट्रात आठवडाभर पावसाची शक्यता?

मुंबई । बंगालच्या उपसागराच्या आग्नेय भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, पुढील काही तासांत त्याचे तीव्र दाबाच्या क्षेत्रात आणि त्यानंतर चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओडिशा, कर्नाटक आणि तमिळनाडूसह अनेक भागांत पावसाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबरदरम्यान काही भागांत पावसाची शक्यता आहे. विदर्भात ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबरला पाऊस होऊ शकतो. मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील काही भागांतही पावसाचा अंदाज आहे.

भारतीय कबड्डी संघ फायनलमध्ये दाखल

दिल्ली । कॉमनवेल्थ कबड्डी चॅम्पियनशिप २०२६ च्या उपांत्य फेरीत भारतीय पुरुष कबड्डी संघाने आपल्या लौकिकाला साजेसा खेळ करत बांगलादेशचा ५६-२७ असा एकतर्फी धुव्वा उडवला. पहिल्या मिनिटापासून अखेरपर्यंत सामन्यावर एकछत्री वर्चस्व गाजवत भारताने दिमाखात अंतिम फेरीत धडक मारली आहे. आता ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या सुवर्णपदकाच्या अंतिम महामुकाबल्यात भारताचा सामना श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. दुसऱ्या उपांत्य फेरीत श्रीलंकेने केनियाचा २८-२४ असा पराभव करत अंतिम फेरी गाठली आहे.

सिंहस्थ कुंभपर्वाचा ऐतिहासिक शंखनाद

नाशकात राष्ट्रपतींच्या हस्ते धर्मध्वजारोहण; रामकुंडावर विधिवत गंगापूजन

वृत्तसंस्था । नाशिक

शनिवारी सकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे गोदातीरावर आगमन झाल्यानंतर त्यांनी पवित्र रामकुंडावर विधिवत गंगापूजन आणि अर्घ्यदान करून धार्मिक विधींना प्रारंभ केला. यावेळी वेदमंत्रांच्या जयघोषात त्यांनी धर्मध्वजाची शास्त्रोक्त पूजा केली. प्रभू श्रीरामांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिकच्या गोदातीरावर आज सिंहस्थ कुंभपर्व २०२६-२०२८ चा अधिकृत आणि मंगलमय शुभारंभ झाला. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते मंत्रोच्चार आणि लाखो भाविकांच्या जयघोषात नाशिकच्या पवित्र रामकुंडावर हा भव्य धर्मध्वजारोहण सोहळा दुपारी १२ वाजून २ मिनिटांच्या मुहूर्तावर अत्यंत उत्साहात संपन्न झाला.



या ऐतिहासिक सोहळ्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार, केंद्रीय आयुष तसेच आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, अन्न व औषध प्रशासन तथा विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, विभागीय आयुक्त शेखर सिंह, जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज आणि १३ आखाड्यांचे प्रमुख साधू-महंत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शनिवार, दि.३१ ऑक्टोबर २०२६ रोजी उभारण्यात आलेल्या या धर्मध्वजाने कुंभपर्वाचा आरंभ झाला असून दि.२४ जुलै २०२८ पर्यंत हा आध्यात्मिक महासोहळा चालणार आहे.

या पर्वातील पहिले अमृतस्नान २ ऑगस्ट २०२७ रोजी होणार आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. या कुंभपर्वास नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी शनिवारी दुपारी १२ वाजून दोन मिनिटांनी ध्वजारोहणाने सुरुवात झाली. नाशिक येथील रामकुंड परिसरात राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कुंभमेळ्याचे ध्वजारोहण महिलेच्या हस्ते होण्याची ही (पान २ वर)

रामकुंडावर उसळली जनसागराची गर्दी

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२६ च्या ऐतिहासिक सोहळ्याला पंचवटीतील पवित्र रामकुंडावर मुख्य धर्मध्वजारोहणाने अत्यंत उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. या सोहळ्यात रस्त्यांवर उसळलेल्या तुफान जनसमुदायामुळे आणि पिवळ्या टोप्या परिधान केलेल्या भाविकांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण नाशिक नगरी भक्तीरसात न्हाऊन निघाली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्र्यंबकेश्वरमध्ये ध्वजारोहण

त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मध्वजारोहण करून सिंहस्थ कुंभपर्वाचा श्रीगणेशा करण्यात आला. तसेच ब्रह्मवृंदाचा जयघोष स्वागतम सुस्वागतम या गीताचे बोल हर हर महादेवचा नारा, अशा उत्साहपुर्ण वातावरणात त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा धर्म ध्वजारोहणाचा कार्यक्रम मंगलमय वातावरणात कुशावर्त तीर्थ परिसरात पार पडला.

अजय देवगणची हायकोर्टात धाव!

एफडीएची कायदेशीर कारवाई थांबणार नसल्याचा तुकाराम मुंढेंचा थेट इशारा

वृत्तसंस्था । मुंबई

पान मसाल्याच्या जाहिरातीवरून बॉलिवूडमधील कलाकारांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत. अभिनेता अजय देवगण, शाहरुख खान आणि टायगर श्रॉफ यांना राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली होती. या नोटीसला आव्हान देत अभिनेता अजय देवगण याने थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. एफडीएची नोटीस मनमानी पद्धतीने बजावण्यात आल्याचा दावा अजय देवगणने याचिकेत केला आहे.

या प्रकरणावर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अजय देवगणने न्यायालयात याचिका दाखल केली असली, तरी एफडीएची कायदेशीर कारवाई थांबणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उलट ही कारवाई अधिक वेगाने पुढे नेण्यात येईल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, या प्रकरणात एफडीएकडून आधीच कारवाई सुरू करण्यात आली आहे. संबंधित तिन्ही कलाकारांना कारणे दाखवा नोटिसा पाठवण्यात आल्या होत्या. या नोटिसांना उत्तर देताना तिघांनीही काही अतिरिक्त वेळ देण्याची मागणी केली होती. मात्र, यापैकी अभिनेता अजय देवगणने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. न्यायालयाने अद्याप एफडीएच्या कारवाईला स्थगिती दिलेली नाही.

४ नोव्हेंबरच्या सुनावणीकडे लक्ष

पान मसाल्याच्या जाहिरात प्रकरणात अजय देवगणने उच्च न्यायालयात धाव घेतल्यामुळे आता या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. एफडीएची नोटीस आणि त्यावरील कायदेशीर आक्षेप यावर न्यायालयात सुनावणी होणार आहे. एकीकडे अजय देवगणने न्यायालयीन मार्ग स्वीकारला आहे, तर दुसरीकडे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कारवाई सुरूच ठेवण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे ४ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीत नेमके काय घडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

डिसेंबरमध्ये पंतप्रधान मोदी जाणार कॅनडाच्या दौऱ्यावर

भारत-कॅनडा संबंधांना मिळणार नवी दिशा?

वृत्तसंस्था । दिल्ली

भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध पुन्हा सुधारण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडताना दिसत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी डिसेंबर महिन्यात कॅनडाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, मोदी यांच्या दौऱ्यापूर्वी भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी कॅनडाच्या परराष्ट्रमंत्री अनीता आनंद यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही देशांमधील सहकार्याचा आढावा घेण्यात आला.

अधिकृत निवेदनानुसार, मोदी यांचा डिसेंबरमधील दौरा भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध अधिक व्यापक आणि मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. या दौऱ्यामुळे व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. ओटावा येथील भारतीय उच्चायुक्तालयाने १६ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान मोदी यांच्या कॅनडा दौऱ्याची माहिती दिली होती. त्यानुसार, मोदी ११ आणि १२ डिसेंबर रोजी कॅनडाला भेट देणार आहेत. कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांनीही या तारखांना दुजोरा दिला आहे.

मोदी यांचा हा दौरा टोरंटो आणि ओटावा या शहरांमध्ये होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या दौऱ्याचा विस्तार आणखी वाढवता येईल का, याबाबतही विचार सुरू असल्याचे कार्नी यांनी यापूर्वी म्हटले होते. त्यामुळे या भेटीत कोणत्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार, याकडे दोन्ही देशांचे लक्ष लागले आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध २०२३ मध्ये मोठ्या तणावातून गेले होते.

तत्कालीन कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनी खलिस्तानी फुटीरतावादी हरदीप सिंह निज्जर यांच्या हत्येमध्ये भारताचा संभाव्य सहभाग असल्याचा आरोप केला होता. भारताने हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले होते. भारताने हे आरोप (पान २ वर)

एस. जयशंकर यांनी शुक्रवारी अमेरिकेतील अटलांटा येथे झालेल्या जी-२० परराष्ट्रमंत्र्यांच्या बैठकीदरम्यान अनीता आनंद यांच्याशी चर्चा केली. या चर्चेत भारत आणि कॅनडामधील द्विपक्षीय सहकार्यामध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी कॅनडा दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांमधील संवाद कायम ठेवण्यावर सहमती झाली.

आयएएस-आयपीएस दाम्पत्य एसीबीच्या रडारवर

४० व्हिलांच्या खरेदीची चौकशी, खासगी कंपनीला फायदा दिल्याचा आरोप

वृत्तसंस्था । जयपुर

वरिष्ठ आयएएस अधिकारी शिखर अग्रवाल आणि त्यांची आयपीएस पत्नी प्रशाखा माथुर यांच्या विरुद्ध राजस्थान लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केली आहे. त्यांच्यावर आरोप आहे की त्यांनी त्यांच्या अधिकृत पदाचा गैरवापर करून १० व्हिला उदयपुर आणि ८ व्हिला अलवार येथे विकत घेतले एका खासगी कंपनीला फायदा मिळवून देण्यासाठी. त्यांच्यावर ने प्रथमिक चौकशी सुर केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी वरिष्ठ आयएएस अधिकारी शिखर अग्रवाल आणि त्यांची आयपीएस पत्नी प्रशाखा माथुर यांच्या विरोधात प्राथमिक चौकशी सुरू केली आहे. त्यांनी अधिकृत पदाचा गैरवापर करून एका खाजगी कंपनीला फायदा मिळवून दिल्याचा आणि राज्य सरकारचे आर्थिक नुकसान केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. राज्य सरकारने आजच शिखर अग्रवाल यांच्या चौकशीला अधिकृत मंजुरी दिली आहे. राजस्थानच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या प्राथमिक चौकशीनुसार, शिखर अग्रवाल आणि त्यांच्या कुटुंबीयांनी खरेदी केलेल्या (पान २ वर)

भारताचा NVS-03 नेव्हिगेशन उपग्रह यशस्वीरीत्या प्रक्षेपित

● इस्रोची मोठी कामगिरी! भारताच्या स्वदेशी दिशादर्शन अन् नेव्हिगेशन क्षमतेला मिळणार बळ

वृत्तसंस्था । मुंबई

उपग्रह घेऊन जाणाऱ्या भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यानाने (GSLV) श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुसऱ्या प्रक्षेपण तळावरून उड्डाण केले.

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने शुक्रवारी भारताचा पुढील पिढीतील नेव्हिगेशन उपग्रह NVS-03 यशस्वीरीत्या प्रक्षेपित केल्याची माहिती समोर आली आहे. या प्रक्षेपणामुळे भारताच्या स्वदेशी दिशादर्शन आणि नेव्हिगेशन क्षमतेला बळ मिळणार आहे. NVS-03 हा भारताच्या नॅव्हिगेशन विथ इंडियन कॉन्स्टेलेशनफ



(NavIC) या उपग्रह प्रणालीचा महत्त्वाचा भाग आहे. ही प्रणाली भारताची स्वतःची नेव्हिगेशन व्यवस्था असून, तिची तुलना अमेरिकेच्या GPS प्रणालीशी केली जाते. उपग्रह घेऊन जाणाऱ्या भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यानाने (GSLV) श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुसऱ्या प्रक्षेपण तळावरून उड्डाण केले. NVS-03 मुळे नागरी नेव्हिगेशनला कशी मदत होणार?

NVS-03 या उपग्रहामध्ये स्पेस ॲप्लिकेशन्स सेंटरने विकसित केलेले स्वदेशी रुबिडियम अणुघड्याळ बसवण्यात आले आहे. हा उपग्रह L1, L5 आणि S बँडमध्ये सिग्नल (पान २ वर)

भारताची स्वतंत्र वेळ प्रणाली उभारण्याचे प्रयत्न

भारतीय प्रमाणवेळ (IST) निश्चित करण्यासाठी भारत स्वतंत्र, जमिनीवर आधारित वेळ प्रणाली विकसित करण्याच्या दिशेनेही काम करत आहे. जून २०२५ मध्ये केंद्र सरकारने GPS वर अवलंबित्व कमी करून देशातील पाच ठिकाणी उभारण्यात आलेल्या अणुघड्याळांच्या मदतीने भारतीय प्रमाणवेळ राखण्याची योजना जाहीर केली होती.

पाकिस्तानी महिला न्यायाधीशांची शायरी भारतात व्हायरल!

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओच्या माहितीनुसार, अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जाशिया रहमान यांनी सुमारे ४०० कायद्याच्या पदवीधरांसाठी आयोजित कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमात त्यांनी तरुण कायदेतज्ज्ञांशी संवाद साधला आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सोशल मीडियावर दररोज अनेक व्हिडीओ व्हायरल होत असतात. सध्या पाकिस्तानमधील एका महिला न्यायाधीशांचा व्हिडीओ असाच चर्चेचा विषय ठरला आहे. जाशिया रहमान असे या महिला न्यायाधीशांचे नाव आहे.

संपादकीय

राजकीय आत्ममंथनाची गरज!

भारतीय राजकारण हे नेहमीच विविध क्लृप्त्यांनी आणि विरोधाभासांनी भरलेले राहिले आहे. येथे विजयाचा उन्माद जितक्या वेगाने डोक्यात जातो, तितकीच पराभवाची धूळ मनावर खोलवर साचून राहते. अलीकडेच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकांचे निकाल हा तसा आपल्या देशाच्या मोठ्या राजकीय कॅनव्हासवरचा एक छोटा भाग वाटू शकतो. पण याच निकालांच्या निमित्ताने दिल्लीच्या सत्तेपासून ते गल्लीबोळापर्यंत जी जुगलबंदी रंगली, ती पुन्हा एकदा आपल्या राजकारणातील अंतर्विरोधावर भाष्य करणारी ठरली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या निकालांच्या आधारे काँग्रेस पक्षाच्या पडझडीवर आणि कामगिरीवर उपरोधिक शब्दांत ताशेरे ओढले. काँग्रेसने नेमक्या किती जागा जिंकल्या, याचा हिशेब करा, असा उपरोधिक टोमणा त्यांनी मारला. एरवी निवडणुकीच्या प्रत्येक छोट्या-मोठ्या विजयावर आपला राजकीय अजेंडा सेट करणाऱ्या सत्ताधाऱ्यांसाठी हा पवित्रा नवा नव्हता; पण राजकारणात प्रत्येक शब्दाला जशी किंमत तसेच तेवढेच उपद्रवमूल्य असते, तशीच प्रत्येक निकालामागे एक सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी दडलेली असते. आगामी काळाची ती चाहूलही असते. याच पार्श्वभूमीवरून निवडणूक निकालाबाबत काँग्रेस पक्षाकडून आलेले प्रत्युत्तर केवळ राजकीय कलगीतुरा नव्हता, तर तो एका मोठ्या वास्तवावर थेट बोट ठेवण्याचा प्रयत्नही होता. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधानांच्या टिप्पणीवर रोखठोक शब्दांत पलटवार केला. नरेंद्र मोदींवर निशाणा साधताना त्यांनी थेट प्रवचनमंत्री असा शब्दप्रयोग करत पंतप्रधानांनाच आत्ममंथनाचा सल्ला दिला. विरोधकांच्या किंवा काँग्रेसच्या जागा मोजण्यापूर्वी स्वतःच्या अंगणात काय सुरू आहे, हे डोळे उघडून पाहावे, अशी त्यांची थेट आणि स्पष्ट भूमिका होती. ज्या वाराणसीला पंतप्रधान नरेंद्र मोदी आपले स्वतःचे संसदीय क्षेत्र म्हणून अभिमानाने मिरवतात, तिथल्या दोन्ही विधान परिषद जागांवर भाजपचा झालेला पराभव आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्य वैचारिक आणि संघटनात्मक ठाणे किंवा मुख्यालय मानल्या जाणाऱ्या नागपुरात भाजपला बसलेला जोरदार फटका, या दोन घटनांकडे दुर्लक्ष करून कसे चालणार? नागपूरची प्रतिष्ठित जागा असो वा पंतप्रधान स्वतः प्रतिनिधित्व करत असलेला वाराणसीचा गड, तिथले निकाल जर थेट सत्ताधारी पक्षाच्या विरोधात जात असतील, तर तो केवळ एका सामान्य पोटनिवडणुकीचा विषय उरत नाही. तो कुठेतरी स्थानिक जनमानसातील अस्वस्थतेचा, बदलत्या प्रवाहाचा आणि नाराजीचा आरसा बनून समोर येत असतो आणि याचा भाजपला अत्यंत प्रामाणिकपणे विचार करावा लागेल. जयराम रमेश यांनी आपल्या उत्तरात देशातील अत्यंत ज्वलंत आणि सामान्य माणसाच्या जगण्याशी जोडलेल्या समस्यांना पुन्हा एकदा ऐरणीवर आणले. आज देशातील करोडो कुटुंबे महागाईच्या खाईत लोटली गेली आहेत. सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे, रोजची सन्मानाने जगण्याची लढाई लढताना मध्यमवर्ग आणि गरीब वर्गाच्या नाकीनऊ आले आहेत. देशातील तरुणांच्या हाताला काम नाही, प्रचंड खर्चिक शिक्षण घेतल्यानंतरही बेरोजगारीचा प्रश्न आ वासून उभा आहे आणि भविष्य अंधकारमय बनले आहे. असे असताना अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाणारे खासगी गुंतवणूक क्षेत्र पूर्णपणे ठप्प पडले आहे. अशा वेळी केवळ निवडणुकांच्या विजय-पराभवाचे हिशेब मांडत बसण्यापेक्षा सामान्य माणसाच्या चुली खरोखर कशा पेटत आहेत, यावर विचार करण्याची गरज असते.म्हणूनच, परस्परांना दूषणे देत उणीदुणी काढत बसण्यापेक्षा अहंकार सोडून या मूलभूत मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करा, असे म्हणणे एक राजकीय टीका म्हणून झटकून टाकण्यापेक्षा त्याचा साकल्याने विचार व्हायला हवा.

दुष्काळात शेतकऱ्यांची सक्तीने कर्जवसुली नको!

खासगी सावकारांच्या छळाविरुद्ध कठोर कारवाईचे पालकमंत्री जयकुमार रावल यांचे निर्देश

प्रतिनिधी । धुळे

दुष्काळी परिस्थितीत आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर बँकांनी सक्तीने कर्जवसुलीचा दबाव आणू नये. खासगी सावकारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक किंवा छळवणूक होत असल्यास पोलिसांनी कठोर कायदेशीर कारवाई करावी. जिल्ह्यातील प्रत्येक गावात पिण्याचे पाणी, पशुधनासाठी चारा, रोजगार आणि गरजू कुटुंबांना अन्नधान्य उपलब्ध होईल, यासाठी प्रशासनाने गावनिहाय नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. आगामी उन्हाळ्यासह ऑगस्ट २०२७ पर्यंतची संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रत्येक गावाचा स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी आमदार राघवेंद्र भदाणे, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जलसंधारणाच्या कामांना गती देताना नादुरुस्त बंधाऱ्यांची दुरुस्ती, पाणलोट क्षेत्र विकास, भूजल पुनर्भरण आणि पाणी अडविणे-जिरविण्याची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. वनक्षेत्रातील पडीक व वृक्षलागवडीस योग्य जमिनींची पाहणी करून आवश्यक प्रस्ताव आणि परवानग्यांची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. प्रलंबित कामांसाठी उपलब्ध आठ ते दहा दिवसांच्या कालावधीचा विचार करून विलंब टाळावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

पशुधनासाठी उपलब्ध हिरवा व सुका चारा, आगामी काळातील गरज आणि संभाव्य चाराटंचाईचा आढावा घेऊन तालुकानिहाय नियोजन करावे. स्थानिक पशुधनासाठी चारा राखून ठेवण्याबरोबरच चारा उत्पादनाला प्रोत्साहन द्यावे. पशुधनासाठी पाणी आणि पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध राहतील, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. दुष्काळ निवारण ही संपूर्ण प्रशासनाची सामूहिक जबाबदारी असून महसूल, कृषी, जलसंपदा, वन, पशुसंवर्धन, रोजगार हमी, सहकार, पुरवठा आणि पोलीस विभागांनी समन्वयाने काम करावे. शेतकरी, शेतमजूर, पशुपालक आणि सर्वसामान्य नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल, अशा पद्धतीने उपाययोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

गावातच रोजगार अन् पशुधनासाठी चाऱ्याची व्यवस्था

दुष्काळामुळे शेतीची कामे कमी झाल्यास ग्रामीण कुटुंबांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागू नये. रोजगार हमी योजना आणि व्हीबी जी राम जी योजनेच्या माध्यमातून गावनिहाय कामांचे नियोजन करावे. जलसंधारण, शेतरस्ते, पाणलोट विकास आणि वृक्षलागवडीच्या कामांतून रोजगार उपलब्ध करून द्यावा, असे रावल यांनी सांगितले.

शेतकरी कर्जमुक्तीतील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जिल्ह्यातील ३६ हजार ३९० पात्र शेतकऱ्यांपैकी २९ हजार ३३० शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. तर ७ हजार ६० प्रकरणे प्रलंबित असून प्रमाणीकरणाची प्रगती ८०.६० टक्के आहे. प्राप्त २८९ तक्रारींपैकी २०० निकाली काढण्यात आल्या असून ८९ तक्रारी प्रलंबित आहेत. आधार प्रमाणीकरणातील अडचणी आणि प्रलंबित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी बँका व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. पात्र शेतकरी तांत्रिक अडचणींमुळे लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे रावल यांनी सांगितले.

ऊसतोड कामगारांनी सर्वेक्षणासाठी सहकार्य करावे

प्रतिनिधी । नंदुरबार

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत ऊसतोड कामगारांची सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी जिल्ह्यात मे. स्मार्ट सर्व्हिसेस या संस्थेमार्फत ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व ऊसतोड कामगारांनी तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या प्रतिनिधींना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुंदरसिंग वसावे यांनी केले आहे. ऊसतोड कामगारांची अद्ययावत माहिती उपलब्ध झाल्यास शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, शैक्षणिक सुविधा, आरोग्यविषयक सेवा, सामाजिक सुरक्षा तसेच रोजगार व कौशल्य विकास योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होणार आहे. सर्वेक्षणादरम्यान कामगारांनी उपलब्ध असलेली आवश्यक कागदपत्रे व माहिती सर्वेक्षण पथकाला द्यावी. शासनाच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी हे सर्वेक्षण महत्त्वाचे असून, एकही पात्र ऊसतोड कामगार सर्वेक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी सर्व संबंधितांनी सहकार्य करावे. सर्वेक्षणाबाबत अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, टोकरतलाव रोड, जिल्हा परिषदेसमोर, नंदुरबार येथे संपर्क साधावा.

तळोदा येथे चारा टंचाईचे तीव्र संकट

प्रतिनिधी । तळोदा

तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याबाबत आणि जिल्हाबाहेर चारा विक्रीवर बंदी घालण्याबाबत आज समस्त भरवाड, गवळी व हरदास समाजाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, पावसाळा सुरू होऊन दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटला तरी वरुण राजाने पाठ फिरवली आहे. त्यामुळे शेतांमध्ये हिरवळ कुठेही शिल्लक नसून हिरवा तसेच कोरडा चारा मिळेनासा झाला आहे. दुभती व भाकड जनावरे जगवणे आता मालकांसाठी अत्यंत कठीण झाले आहे. चारा टंचाईमुळे दुभत्या जनावरांचे दूध आटले असून, पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न पूर्णपणे थांबले आहे. पशुपालकांचे संपूर्ण कुटुंब आणि उपजीविका केवळ या जनावरांवर आणि दुग्ध व्यवसायावर अवलंबून असल्याने त्यांच्यासमोर आता उपासमारीचे मोठे संकट उभे राहिले आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची त्वरित दखल घेऊन जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करावी आणि जिल्ह्याबाहेर होणारी चाऱ्याची वाहतूक व विक्री तातडीने थांबवावी, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर गोकुळ दुला भरवाड, कवा तेजा भरवाड, देपुर कमा भरवाड, राजु राधा भरवाड, मेळा बेरा भरवाड, रुखा पता भरवाड, मेळा भुरा भरवाड, रमेश फुज्या चितकथे, अजय सामा चितकथे यांच्यासह अनेक पशुपालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री हसन मुश्रीफ, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, खा. गोवाल पाडवी, आ. राजेश पाडवी आणि नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांनाही योग्य त्या कारवाईसाठी पाठवण्यात आल्या आहेत. पाऊस न पडल्याने जमिनीवरील हिरवळ पूर्णपणे नष्ट झाली आहे. दुभती जनावरे चारा नसल्याने दूध देत नाहीत, ज्यामुळे आमचे उत्पन्न घटले आहे.

पान १ वरुन

डिसेंबरमध्ये पंतप्रधान मोदी......

निराधार आणि बिनबुडाचे असल्याचे सांगितले होते. या वादामुळे दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांवर परिणाम झाला होता. मात्र, आता हे संबंध पुन्हा सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये झालेल्या संसदीय निवडणुकीत मार्क कार्नी यांच्या विजयानंतर दोन्ही देशांनी संबंध सुधारण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली. विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्यासाठी आधीपासून अस्तित्वात असलेल्या अनेक यंत्रणा पुन्हा सक्रिय करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे.

भारताचा......

प्रसारित करणार आहे. यातील L1 बँडमुळे आधुनिक स्मार्टफोनमधील नेव्हिगेशन चिपसेट आणि वेअरेबल उपकरणांना NavIC प्रणालीशी जोडणे अधिक सुलभ होऊ शकते. नेव्हिगेशनसाठी उपग्रहांकडून मिळणाऱ्या सिग्नलमध्ये अचूक वेळेला विशेष महत्त्व असते. रुबिडियम अणुघड्याळामुळे उपग्रहाच्या वेळेची अचूकता राखण्यास मदत होते.

सिंहस्थ कुंभपर्वाचा......

पहिलीच वेळ. ध्वजारोहणाआधी राष्ट्रपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत काही धार्मिक विधी पूर्ण करण्यात आले.धर्मध्वजाचे पूजन, गंगापूजन तसेच ध्वजस्तंभाचे पूजन करण्यात आले. रामकुंड परिसरात मुख्य धर्मध्वजासह गंगा-गोदावरी मंदिरावर ध्वजारोहण करण्यात आले. रामकुंड येथे उभारण्यात येणारा मुख्य धर्मध्वज स्तंभ हा ५१ फूट उंच आणि पंचधातूंचा वापर करुन तयार करण्यात आलेला आहे. या स्तंभावर समुद्रमंथनातून बाहेर आलेल्या १४ रत्नांचे प्रतिक साकारण्यात आले आहे. अमृत कलश धरलेला गरुडही स्तंभावर कोरण्यात आला आहे. दुसरा धर्मध्वज स्तंभ श्री गंगा गोदावरी माता मंदिराजवळ उभारण्यात आला आहे. या स्तंभाची उंची ३१ फूट असून हा स्तंभही पंचधातूचा आहे. या स्तंभावरही समुद्रमंथनातून आलेल्या १४ रत्नांचे चिन्ह आहे. त्यात हलाहल विष (कालकूट), कामधेनु (सुरभि गाय), उच्चैःश्रवा घोडा, ऐरावत हत्ती, कौस्तुभ मणी, कल्पवृक्ष पारिजात, रंभा (अप्सरा), महालक्ष्मी, वारुणी (सुरा/मद्य), चंद्रदेव (चंद्र), धन्वंतरी वैद्य, धनुष्य (हरिधनु), पांचाजन्य शंख, अमृत (अमृतकुंभ) यांचा समावेश आहे. मुख्य धर्मध्वज हा साडेपंधरा फूट लांब आणि साडेपाच फूट उंचीचा आहे. ध्वजाच्या एका बाजूला बृहस्पतीचे वाहन सिंह, काळाचे प्रतिक म्हणून चंद्र-सूर्य दाखविण्यात आले आहेत. जोपर्यंत चंद्र, सूर्य आहेत, तोपर्यंत कुंभमेळा हा होतच राहणार, असा त्याचा अर्थ सांगितला जातो. मुख्य धर्मध्वजावरील सिंह हा शूरत्वाचे प्रतीक आहे. धर्मध्वजाच्या दुसऱ्या बाजूला अमृतकलश दाखविण्यात आला आहे. तो गोदामातेचे अमरत्वाचे व मुक्तीचे प्रतीक आहे. तसेच श्री आणि ओम हे हिंदू धर्माचे शुभचिन्ह म्हणून दाखवले आहे. मुख्य धर्मध्वजाला बारा रेशीम गोंडे, अंतर्नाद आणि ब्रम्हनादाचे प्रतिक म्हणून १५ घंटा आणि तीन घुंगरू आहेत. ध्वजाच्या चारही बाजूंना सुवर्ण रंगाची जरीची लेस लावण्यात आली आहे. श्री गंगा गोदावरी पुरोहित संघाचा धर्मध्वज नऊ फूट लांब आणि पाच फूट उंचीचा आहे.

आयएएस-आयपीएस......

व्हिलांमधील कथित अनियमितता आढळून आल्या आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने एका निवेदनात म्हटले आहे की, अग्रवाल यांनी अनंता ब्रँड नावाखाली हॉटेल्स आणि रिसॉर्टस चलवणाऱ्या गोयल फॅशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या या कंपनीच मालमत्ता खरेदी केली आणि त्या कंपनीच्या संचालकांशी संगनमत करून अनुचित लाभ मिळवून दिला, असे निवेदनात म्हटले आहे. लाचलुचपत विभागाला असेही सापडले की अग्रवाल यांनी कंपनीच्या संचालकांशी संगनमत करून अग्रवाल यांनी अनंता रिसॉर्टसमध्ये आपल्या आणि कुटुंबियांच्या नावाने व्हीला विकत घेतले. मार्च २०२६ मध्ये त्यांनी २० व्हीला विकत घेतले. उदयपूर मधील बुझडा रिसॉर्ट आणि अलवार जिल्ह्यातील अजबगड येथे देखील व्हीला विकत घेतले, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. प्रथमिक चौकशीत मिळालेल्या माहितीनुसार, शिखर अग्रवाल आणि त्यांच्या आयपीएस अधिकारी पत्नी प्रशखा माथुर यांनी उदयपूरच्या बुझडा रिसॉर्ट येथील १० व्हीला प्रत्येकी १५ लाखात विकत घेतले आणि अजबगड येथील ८ व्हीला जवळपास १६.५ लाखांना घेतले. शिखर अग्रवाल यांच्या २ मुलांच्या नावावर ४ व्हीला विकत घेतले आहे. हे व्हीला प्रत्येकी जवळपास १५ लाख रुपये आहे. चार व्हीला इतर नातेवाईकांच्या नावाने घेण्यात आले आहे. अग्रवाल यांनी स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या नावे, त्यांच्या उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता जमा केली आहे का, याची चौकशी करणे आवश्यक आहे.

धुळ्यात २ नोव्हेंबर रोजी डाक अदालत

प्रतिनिधी । धुळे

टपाल सेवांबाबतच्या प्रलंबित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी धुळे डाक विभागात सोमवार,दि. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मासिक डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. डाकघर विभागाचे प्रवर अधीक्षक संजय ताठे यांनी ही माहिती दिली. टपाल विभागाकडे तक्रार दाखल करून सहा आठवडे उलटूनही निराकरण झालेले नाही किंवा समाधानकारक उत्तर मिळालेले नाही, अशा तक्रारी नागरिकांना डाक अदालतीत मांडता येतील. टपाल, स्पीड पोस्ट, काउंटर सेवा, पार्सल, बचत बँक खाते आणि मनीऑर्डरशी संबंधित तक्रारींचा यात समावेश असेल. तक्रारीसोबत मूळ तक्रार दाखल केल्याची तारीख, संबंधित अधिकाऱ्याचे नाव व पदनाम आणि तक्रार पाठविल्याचा तपशील जोडणे आवश्यक आहे.

पाणीटंचाईमुळे १२ एकर केळीच्या बागेवर फिरवले रोटावेटर

मामाचे मोहिदे येथील शेतकऱ्या ३० लाखांवर नुकसान

प्रतिनिधी । शहादा

तालुक्यातील मामाचे मोहिदे येथील शेतकरी रमाकांत पाटील यांना पाणीटंचाईमुळे तब्बल १२ एकर शेतातील केळीच्या बागेवर रोटावेटर फिरवण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. त्यामुळे हाताशी आलेले पीक वाचवणे अशक्य झाल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

रमाकांत पाटील यांचे शेत सर्व्हे नंबर ४५३ व ४५४ मध्ये असून त्यांनी १२ एकरात केळीची बाग लावली होती. चालू वर्षी पावसाळा कमी झाल्याने मामाचे मोहिदा शिवारातील जमिनीत पाण्याचा निचरा कमी झाला. त्यामुळे बोअरवेल व पाण्याच्या विहिरी आटल्या. परिणामी डोळ्यादेखत उभी असलेली केळीची बाग वाळू लागल्याने अखेर नाइलाजास्तव त्यांनी बागेवर रोटावेटर फिरवला.

शेतकरी रमाकांत पाटील यांनी आपल्या बारा एकर शेतात केळीची बाग उभी करण्यासाठी लागवड व इतर शेतकामासाठी जवळपास दहा लाख रुपये खर्च केले होते. २५ ते ३० लाख या बागेतून त्यांना सुम रुपये उत्पन्नाची अपेक्षा होती. मात्र ऐन पीक वाढीच्या काळात बोअरवेलमधील पाणी आटल्याने संपूर्ण बागेला पाणी देणे अशक्य झाले. विशेष म्हणजे शेतापासून अवघ्या सात किलोमीटर अंतरावर सारंगखेडा येथे तापी नदीवरील बंधारा, धरण असतानाही शेतकऱ्यांना त्याचा सिंचनासाठी अपेक्षित लाभ मिळत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

वरणगावात दर मंगळवारी भिक्षुकांना मायेचा घास

सत्यसाई सेवा मंडळ समितीचा स्तुत्य उपक्रम; वाढदिवसाचा आनंदही अन्नदानातून साजरा

विजय वाघ । वरणगाव

अन्नदान हेच श्रेष्ठदान या उक्तीचा प्रत्यय वरणगाव शहरात दर मंगळवारी येत आहे. शहरात भरणाऱ्या आठवडे बाजारानिमित्त विविध भागांतून येणाऱ्या भिक्षुकांना श्री सत्यसाई सेवा समितीच्या वतीने सन्मानाने बसवून पोटभर अन्नदान केले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कोणताही गाजावाजा न करता अखंडपणे सुरू असलेल्या या उपक्रमातून दर मंगळवारी भिक्षुकांची भूक भागविली जात असून मंडळाच्या या सेवाभावी कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वरणगाव शहरात मंगळवारी आठवडे बाजार भरत असल्याने परिसरातील अनेक भिक्षुक सकाळ पासूनच शहरात दाखल होतात. अशा गरजू व भुकेल्या व्यक्तींना दोन वेळच्या अन्नासाठी भटकंती करावी लागू नये या सामाजिक जाणिवेतून श्री सत्यसाई सेवा समितीने अन्नदानाचा उपक्रम हाती घेतला आहे. शहरातील रामपेठ चौफुली जवळील तलाठी कार्यालयाच्या आवारात दर मंगळवारी पूजा-अर्चा करून अन्नदानाला सुरुवात केली जाते. यावेळी भिक्षुकांना आदराने बसवून विविध प्रकारचे ताजे व पौष्टिक अन्न दिले जाते. अलीकडे वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणावर अनावश्यक खर्च करण्याची प्रथा वाढत असताना वरणगाव शहर व परिसरातील काही सामाजिक कार्यकर्ते आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री सत्यसाई सेवा समितीच्या माध्यमातून भिक्षुकांना अन्नदान करीत आहेत. गरजूंची भूक भागवून वाढदिवसाचा आनंद साजरा करण्याच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून समाजासमोर आदर्श निर्माण केला जात आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

शौर्य मराठी
epaper.shauryamarathi.com

दिन विशेष...

१८५८ : ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार संपून व्हिक्टोरिया राणी भारताची सम्राज्ञी झाली.
१९५६ : भारतात भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आली.
१९५६ : मुंबई हे द्वैभाषिक राज्य म्हणून अस्तित्वात आले व यशवंतराव चव्हाण पहिले मुख्यमंत्री झाले.

थोडक्यात

मतदार यादीवरील दावे–हरकतींसाठी मुदतवाढ

जळगाव । विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादीवरील दावे व हरकती सादर करण्यासाठी १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्राची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर दावे व हरकती सादर करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. मात्र, आता सुधारित वेळापत्रकानुसार ही मुदत १३ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकतींचा निपटारा करण्यासाठी २५ नोव्हेंबरपर्यंत मुदत राहणार आहे.

आसोदा विद्यालयात राष्ट्रीय एकता दिन उत्साहात साजरा

जळगाव । असोदा येथील सार्वजनिक विद्यालयात भारताचे पहिले गृहमंत्री व पहिले उपपंतप्रधान भारतरत्न सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त व राष्ट्रीय एकता दिनानिमित्त त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचा आठवीचा विद्यार्थी हर्षल नितीन कोळी याने भूषवले. या प्रसंगी विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका मंगला नारखेडे, एस.के.राणेराजपूत व अनिता पाटील यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थिनी कु. नेहा बाविस्कर, देवानंद सोनवणे व मानव प्रशांत पाटील या विद्यार्थ्यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्याला त्यांच्या भाषणातून उजाळा दिला व राष्ट्रीय एकता दिनाचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन भारती पाटील व आभार स्वाती पाटील यांनी मानले.

पेन्शनधारकांसाठी डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान

जळगाव । पेन्शनधारकांना हयातीचा दाखला सादर करण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, यासाठी १ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत डिजिटल जीवन प्रमाणपत्र अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानाचा वापर करून अँड्रॉइड किंवा आयओएस स्मार्टफोनद्वारे अवघ्या ६० सेकंदांत हयातीचा दाखला सादर करता येणार आहे. या अभियानांतर्गत ८० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या अति-ज्येष्ठ नागरिकांसाठी घरपोच सेवा आणि विशेष मदतीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. देशभरातील २ हजारांहून अधिक शहरे व जिल्ह्यांमध्ये विविध बँका, ७८५ टपाल कार्यालये, रेल्वे आणि संरक्षण विभागाच्या कार्यालयांमध्ये विशेष शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. पेन्शनधारकांनी स्मार्टफोनमध्ये गुगल प्ले स्टोअरवरून AadhaarFaceRd' आणि Jeevan Pramaan ही ॲप्स डाउनलोड करावीत. त्यानंतर आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी नोंदवून मोबाईलवर प्राप्त ओटीपी प्रविष्ट करावा.

भोकर स्टेट बँकेवर सशस्त्र दरोडा

बँक व्यवस्थापक,रोखपालाला मारहाण करीत खुर्चीला ठेवले बांधून; रोख रकमेसह सोने लंपास

प्रतिनिधी । जळगाव

तालुक्यातील भोकर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) शाखेत शनिवार,दि.३१ ऑक्टोबर रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास दिवसाढवळ्या सशस्त्र दरोडा पडल्याची खळबळजनक घटना घडली. पाच ते सहा दरोडेखोरांनी दुचाकीवरून येत बँकेत प्रवेश केला. त्यानंतर बँकेतील कर्मचाऱ्यांना बंदुकीचा धाक दाखवून रोख रकमेसह सोने लुटून नेले. एवढेच नव्हे तर बँक व्यवस्थापक आणि रोखपालाला मारहाण करून खुर्चीला बांधून ठेवले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

शनिवारचा दिवस असल्याने आज दुपारी बँकेत ग्राहकांची वर्दळ त्यातुलनेने कमी होती. याच संधीचा फायदा घेत पाच ते सहा दरोडेखोर दुचाकीवरून भोकर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत दाखल झाले. त्यांनी बँकेतील कर्मचाऱ्यांना शस्त्रांचा धाक दाखवत धमकावण्यास सुरुवात केली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे बँक कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरोडेखोरांनी कर्मचाऱ्यांना विरोध करण्याची संधी न देता बँकेतील रोख रक्कम आणि सोने जवळील बॅगांमध्ये भरून घेतले. तसेच दरोड्यादरम्यान दरोडेखोरांनी बँक व्यवस्थापक आणि रोखपालाला मारहाण केली. त्यानंतर दोघांनाही खुर्चीला बांधून ठेवले. बँकेतील इतर कर्मचाऱ्यांनाही बंदुकीचा धाक दाखवून दहशतीखाली ठेवण्यात आले. लुटीचा प्रकार पूर्ण केल्यानंतर सर्व दरोडेखोर दुचाकींवरून घटनास्थळावरून पसार

झाले. दरोडेखोर बँकेतून पसार झाल्यानंतर घटनेची माहिती जळगाव तालुका पोलिसांना देण्यात आली. दरम्यान, दरोडेखोर जळगावच्या दिशेने पळून जात असताना किडसाई गावाजवळ काही ग्रामस्थांना त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. ग्रामस्थांनी त्यांना हटकले असता झालेल्या प्रकारात एक दरोडेखोर त्यांच्या ताब्यात सापडला. संतप्त ग्रामस्थांनी त्याला पकडून बेदम मारहाण केली. इतर ठिकाणी आणखी दोन दरोडेखोर पकडण्यात आले. त्यांच्याजवळील बॅगा देखील हस्तगत केल्याची माहिती समोर येत आहे.

बँकांच्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

या घटनेची माहिती मिळताच तालुका पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांच्या ताब्यात असलेल्या दरोडेखोराला पोलिसांनी आपल्या ताब्यात घेतले. तसेच दुसऱ्या गावात दोन जण असे एकूण तीन दरोडेखोर ताब्यात घेतले. मात्र, त्याचे इतर साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. भोकर येथील एसबीआय शाखेत झालेल्या या धाडसी दरोड्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. दरोडेखोरांनी नेमकी किती रोख रक्कम आणि किती सोने लुटले, याचा तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही. तसेच पकडण्यात आलेल्या आरोपीकडून अन्य साथीदारांची माहिती मिळविण्याच्या दृष्टीने पोलिस तपास महत्त्वाचा ठरणार आहे. बँकेतील सीसीटीव्ही चित्रण आणि घटनास्थळावरील पुराव्यांच्या आधारे दरोडेखोरांचा माग काढण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. दिवसा गजबजलेल्या बँकेत शस्त्रांच्या धाकावर झालेल्या या दरोड्यामुळे बँकांच्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा जळगाव तालुका पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

'पढेंगे तो बढेंगे' उपक्रमातून दिवाळी अंकांचे वाटप

प्रतिनिधी । धरणगाव

ग्रामीण भागातील वंचित मुलांना अवांतर वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने येथील पी.आर. हायस्कूल ने पढेंगे तो बढेंगे अभियाना तर्गत सुबोध ग्रामीण दिवाळी अंकांचे मोफत वाटप केले या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

ज्ञानप्रबोधिनी, छात्र प्रबोधन पुणे यांच्यामार्फत वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबवला जातो. त्या अनुषंगाने प्रबोधनदूत डॉ. बापू शिरसाठ यांच्या पुढाकाराने यावर्षीचा दीपोत्सव वाचन दिवाळी म्हणून साजरा करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. कुमारवयासाठी सुबोध ग्रामीण दिवाळी अंक ५० विद्यार्थ्यांना मोफत वितरण संस्थाध्यक्ष डॉ .अरुण कुलकर्णी,सचिव डॉ मिलिंद डहाळे, डॉ. पद्मिनी डहाळे,शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील, पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी, डॉ. वैशाली गालापुरे यांच्या उपस्थितीत आज पार पडला. मोबाईलचे प्रस्थ समाज जीवनात वाढत असताना विद्यार्थी वाचनापासून दूर जाऊ नये यासाठी शासन महावाचन, वाचन प्रेरणा दिन यासारखे अभिनव उपक्रम राबविते. महावाचन उपक्रमात पी. आर. हायस्कूल उत्स्फूर्त सहभागी झाल्यानंतर विद्यार्थ्यांना अभ्यास पूरक अवांतर वाचनाची गोडी वाढली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ज्ञानग्रहण करताना बौद्धिक क्षमता विकसित होऊन आजच्या स्पर्धेत कुठेही मागे राहू नयेत म्हणून दैनंदिन जीवनातील मोबाईलच्या भासमान जगाच्या अतिरिक्त वापराला पायबंद घालण्यासाठी वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे काळाची गरज आहे हे ओळखून यावर्षीची दिवाळी फटाके विरहित साजरी व्हावी या उद्देशाने सुबोध दिवाळी अंक मोफत दिल्याचे प्रबोधन दूत डॉ.बापू शिरसाठ यांनी सांगितले. या उपक्रमाला इयत्ता पाचवी ते सातवीच्या पन्नास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ज्येष्ठ कवी भगवान भटकर यांच्या काव्यसंग्रहांचा आज प्रकाशन सोहळा

प्रतिनिधी । जळगाव

ज्येष्ठ कवी भगवान भटकर यांच्या दोन काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा दि.१ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालय अल्पबचत भवन सभागृहात होणार आहे. कवितेच्या वळणवाटा या मराठी काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी प्रा.वा. ना.आंधळे यांच्या हस्ते, तर तुकबंदी या हिंदी-उर्दू काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुप्रसिद्ध कवी डॉ. रफिक काझी यांच्या हस्ते होणार आहे.

लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंतीनिमित्त चोपडा शहर पोलिसांची एकता दौड

प्रतिनिधी । चोपडा

चोपडा शहर पोलिस स्टेशनच्या वतीने पोलिस निरीक्षक पवनकुमार देसले यांच्या मार्गदर्शनाखाली लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली.

दि.३१ रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त चोपडा शहर पोलीस स्टेशनच्यावतीने चोपडा शहर पोलिस स्टेशन ते सराफ बाजारमार्गे महाराज चौक ते पुन्हा तोच रिटर्न मार्ग एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते. सदरील दौडमध्ये चोपडा शहर पोलिस स्टेशन कडील पोलिस अधिकारी व अंमलदार, पोलिस कर्मचारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

जळगाव मनपा सुविधा देत नसेल तर करमाफीचा ठराव पारित करा!

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव मनपा नागरिकांना सुविधा देत नसेल तर स्माफीचा ठराव पारित करा व येणाऱ्या नागपूर अधिवेशनात काही आपले वजन असेल तर ठराव मंजूर करून आणून जळगाव शहरवासियांना करमाफी मिळवून द्या,अशी मागणी रा. कॉं. शरदचंद्र पवार पक्षाने केली आहे.

जळगाव शहरवासीयांना मनपा आरोग्य, साफसफाई, दिवाबत्ती, रस्ते, गटारी, पाणी पुरवठा आदी आवश्यक सुविधा देण्यास सत्ताधारी मनपात अपयशी ठरत आहे पण त्याचे खापर मनपा प्रशासनावर फोडून जळगाव शहराचे आमदार मोकळे होत असून गेल्या दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद व मनपात बैठका घेऊन संवग घोषणा करून नागरिकाचे मन जिंकण्याचा केविलवाणा प्रयत्न करित आहे. मनपा प्रशासनाच्या बैठकीत आमदार महोदय म्हणाले सुविधा देऊ शकत नसाल तर नागरिकांकडून करवसुली बंद करा. परंतु आमदार महोदय तीन वेळा नगरसेवक व तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले त्यांना हेही माहीत नाही. तसेच जळगाव शहरातील व्यापारी गाळे धारकांचा गेल्या पंधरा वर्षापासूनचा तीन टक्के दर कमी होऊ शकत नाही. आमदार महोदय आपणास जळगाव शहर नागरिकांसाठी तळ मळ असेल तर मनपात ९५ टक्के नगरसेवक तुमचे आहेत, सत्ता तुमची आहे तर तसा ठराव मनपा महासभा घेऊन पूर्ण बहुमताने ठराव पास करून मंजूर करा, अशी मागणी रा.कॉं शरदचंद्र पवार पक्ष महानगर जिल्हाध्यक्ष अशोक लाडवंजारी, डॉ.संग्रामसिंग सुर्यवंशी, राजू मोरे, विनायक पाटील, मंगला पाटील, किरण राजपूत, गणेश पाटील, अमोल कोल्हे, ललित नारखेडे, भगवान सोनवणे, सुनील माळी, सुहास चौधरी, रिंकू चौधरी, आकाश हिवाळे, चेतन पवार, मजहरभाई पठाण, रईस खाटीक, गौरव वाणी, गिरीश सांगळे, रफीक पटेल, नईम खाटीक, दत्तात्रय सोनवणे, सुमन बनसोडे, माधुरी पाटील, मनिषा देशमुख, गणेश हटकर, दिपक हटकर आदींनी केली आहे.

आमडदे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चेअरमनपदी शामकांत भोसले

प्रतिनिधी । भडगाव

भडगाव तालुक्यातील आमडदे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी चेअरमनपदी शामकांत अशोक भोसले तर व्हाइस चेअरमनपदी दीपक धर्मराज भोसले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल पॅनल प्रमुख प्रतापराव हरी पाटील व सर्व संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच माध्यमिक पतपेढी, जळगावचे संचालक जगदीश अशोक पाटील, दीनानाथ दुध उत्पादक सोसायटी, आमडदेचे विद्यमान चेअरमन हरिश्चंद्र भोसले यांनीही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होवो आणि शेतकरी सभासदांच्या हितासाठी त्यांचे कार्य अधिक प्रभावीपणे घडत राहावे या निवडीबद्दल अखिल भारतीय मराठा महासंघ उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख डॉ बी बी भोसले यांनीही भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या,



चोपडा - भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंती दिनानिमित्ताने सुंदर हस्तलिखित चित्र धानोरा येथील झि.तो.महाजन माध्यमिक व ना.भा.पाटील ज्युनियर कॉलेज धानोरा येथील कलाशिक्षक सिराज तडवी यांनी फळ्यावर खडुने रेखाटलेले चित्र लक्ष वेधून घेत आहे.

'चेस इन स्कूल' पुन्हा जोमाने शाळांमध्ये राबविण्याचा महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या संकल्प

५ हजार शाळांपर्यंत पोहचणार; जैन हिल्सच्या बैठकीत २० जिल्ह्यांतील प्रतिनिधींचा सहभाग

प्रतिनिधी । जळगाव

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि., महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि जैन स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या संयुक्त सहकार्याने पुढील पाच ते दहा वर्षात ५ हजार शाळांपर्यंत चेस इन स्कूल हा उपक्रम राबविला जाईल. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेच्या जैन हिल्स येथे झालेल्या बैठकीत याबाबतचे उद्दिष्ट ठरले.

याप्रसंगी जैन इरिगेशनचे अध्यक्ष तथा अखिल भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सल्लागार अशोक जैन, जळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष अतुल जैन, ग्रॅण्डमास्टर अभिजित कुंटे, महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे सचिव निरंजन गोडबोले हे व्यासपीठावर उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते चेस इन स्कूल या उपक्रमाचा श्रीगणेशा केला. या बैठकीत राज्यातील जवळपास २० जिल्ह्यांचे प्रतिनिधींनी सहभाग घेतला.२००८ पासून अशोक जैन यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेने उल्लेखनीय प्रगती केली आहे. आज संघटना देशातील अग्रगण्य संघटनांपैकी एक बनली आहे. राज्यातील ३३ जिल्हे संघटनेशी संलग्न आहेत. गेल्या आठ, दहा वर्षांपासून मागे पडलेला चेस इन स्कूल हा उपक्रम अशोक जैन, अतुल जैन यांच्या पुढाकाराने आज पुन्हा सुरू करण्यात आला. या उपक्रमाच्या पुनरुज्जीवनासाठी जैन इरिगेशन, जैन स्पोर्ट्स अकॅडमीने पुढाकार घेतल्याबद्दल अशोक जैन व अतुल जैन यांचे महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेतर्फे आभार व्यक्त करून अशोक जैन यांचा अभिजीत कुंटे यांनी तर अतुल जैन यांचा चेस इन स्कूल उपक्रमाचे सचिव विलास म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी चेस इन स्कूलच्या लोगोचे अनावरण मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. या उपक्रमाची पहिली शाळा ही अनुभूती बालनिकेतन व विद्यानिकेतन ठरली. त्यांना मान्यवरांच्या हस्ते बुद्धिबळाचे साहित्य देण्यात आले. प्रत्येक शाळेत तीन जणांची सोय करावी व हा उपक्रम राज्यभर राबवावा ही प्राचार्य मनोज परमार सह शाळेतील सहकाऱ्यांनी स्वीकारली. खेळात राजकारण नको, तर खेळाडू घडविणे हेच आपले ध्येय असावे. चेस इन स्कूल हा उपक्रम महाराष्ट्रातील बुद्धिबळ विकासासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. त्यासाठी आर्थिक, मनुष्यबळ व संघटनात्मक सहकार्य देऊ,अशी ग्वाही अशोक जैन यांनी दिली.

कास्ट्राइब शिक्षक संघटनेच्या धरणगाव तालुकाध्यक्षपदी कैलास पवार यांची नियुक्ती

प्रतिनिधी । धरणगाव

कास्ट्राइब संघटनेच्या राज्य अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर धरणगाव येथे आयोजित कॉर्नर सभेत विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. यामध्ये कास्ट्राइब शिक्षक संघटनेच्या धरणगाव तालुकाध्यक्षपदी कैलास पवार यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी विनायक बैसाणे, तर महिला कार्यकारिणी सदस्यपदी रत्ना कंखरे यांची नियुक्ती करण्यात आली.

या सभेत जिल्हा व राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी राज्याचे कार्याध्यक्ष अनिल सुरडकर, शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापू साळुंके, जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुण बागुल आणि सल्लागार रमेश सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. सभेत दगडू सूर्यवंशी, भूपेंद्र बाविस्कर, किशोर म्हस्के आणि महादू अहिरे यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले. कैलास पवार यांची शिक्षक संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे शिक्षक, सहकारी, मित्रपरिवार व विविध स्तरांतून अभिनंदन होत असून पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

नशामुक्त युवा । विकसित भारतचा संदेश देत मिनी मॅरेथॉन उत्साहात

एकलव्य क्रीडा संकुलाच्या पुढाकाराने शेकडो धावपटूंचा उत्स्फूर्त सहभाग; शालेय-खुल्या गटातील विजेत्यांचा गौरव

प्रतिनिधी । जळगाव

युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे, निरोगी जीवनशैलीचा प्रसार करणे तसेच शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडाप्रेम आणि सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लावण्याच्या उद्देशाने नशामुक्त भारत अभियानांतर्गत आयोजित मिनी मॅरेथॉन २०२६ स्पर्धा जळगाव येथे उत्साहात पार पडली.

मिनिस्ट्री ऑफ युथ अफेअर्स अँड स्पोर्ट्स, भारत सरकार, भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI), फिट इंडिया चळवळ आणि खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित एकलव्य क्रीडा संकुल, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नशामुक्त युवा - विकसित भारत हा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून के.सी.ई. सोसायटीचे सहसचिव ॲड. प्रवीणचंद्र जंगले उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे (SAI) असिस्टंट डायरेक्टर माधव कांबळे (कांदिवली ईस्ट, मुंबई) उपस्थित होते. तसेच श्री. स्वामी समर्थ शैक्षणिक संस्थेचे संस्थापक मनोज पाटील, MyBharat चे जिल्हा युवा अधिकारी अभिषेक चौरे, रामानंद नगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सचिन रनशेवरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी के.सी.ई. सोसायटी व्यवस्थापन मंडळाचे सदस्य भालचंद्र प्रभाकर पाटील व स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा.राजश्री महाजन आणि ओरियन सी.बी.एस.ई. स्कूलच्या मुख्याध्यापिका सुषमा कंची आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी नशामुक्त भारत अभियानाची सामूहिक शपथ घेतली. स्पर्धकांसाठी वार्मअप, झुम्बा व एरोबिक्सचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून मिनी मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली.

स्पर्धेत शालेय गटासाठी ५ किलोमीटर आणि खुल्या गटासाठी १० किलोमीटर असे दोन अंतर निश्चित करण्यात आले होते. शालेय गटाची सुरुवात एम.जे.कॉलेज येथून होऊन काव्यरत्नांजली चौक, महाबळ चौक, संत गाडगेबाबा चौक व तेथून पुन्हा एम.जे. कॉलेजपर्यंत करण्यात आली. खुल्या गटाची स्पर्धा एम.जे. कॉलेज, काव्यरत्नांजली चौक, महाबळ चौक, संत गाडगेबाबा चौक, पैलवानबाबा दर्गा व तेथून पुन्हा एम.जे.कॉलेज अशा मार्गावर पार पडली. धावपटूंनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत व्यसनमुक्ती आणि आरोग्याचा संदेश दिला. स्पर्धेनंतर सहभागी धावपटूंसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली. यावेळी व्यसनमुक्तीचा संदेश देणारे पथनाट्य सादर करण्यात आले. पथनाट्याच्या माध्यमातून व्यसनांचे दुष्परिणाम आणि व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले.

यशस्वितेसाठी एकलव्य क्रीडा संकुलातील डॉ.रणजीत पाटील, चंद्रलेखा जगताप, निलेश खडके, वसंत सोनवणे, योगेश चव्हाण, अंकुश तेली, पंकज बाविस्कर, अमोल गोमटे, योगेश महाजन, पंकज महाजन, सागर सोनवणे तसेच सर्व कर्मचारीवर्गाने विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम एकलव्य क्रीडा संकुलाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून स्पर्धेची सांगता करण्यात आली. या मिनी मॅरेथॉनच्या माध्यमातून युवकांनी व्यसनांपासून दूर राहून नियमित व्यायाम, क्रीडा आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करावा, असा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात शालेय व खुल्या गटातील मुलगे-मुली आणि पुरुष-महिला अशा विभागांतील प्रथम ते सहावा क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.शालेय गट (१३ ते १६ वर्षे) मुलांमध्ये प्रथम - कार्तिक दीपक हटकर, द्वितीय कुणाल बाळू महाले, तृतीय नैतिक पद्माकर चव्हाण, चौथा साहिल आत्माराम सुरळकर, पाचवा सिद्धेश गोपाल धिवर, सहावा प्रणव अनिल कवाडकर आणि मुलीमध्ये प्रथम - सेजल कमलाकर मोरे,द्वितीय तेजस्विनी ताराचंद ढाके, तृतीय गायत्री ज्ञानेश्वर पाटील, चौथा धनश्री सोमनाथ चाटे, पाचवा सयाली गुलाबचंद मेंढेकर, सहावा गायत्री गणेश भोर, तर खुला गट (१७ वर्षे व त्यावरील) पुरुष गटात प्रथम अजय तल्हिम तडवी, द्वितीय योगेश प्रवीण पाटील, तृतीय अजय आपसिंग वसावे, चौथा नदीम यासीन तडवी, पाचवा अक्षय निमसिंग गावित, सहावा यश रमेश महाजन, तर महिलामध्ये प्रथम गायत्री योगेश सोनवणे, द्वितीय गायत्री कृष्णा बोरसे, तृतीय रोहिणी नरेंद्र बिऱ्हाडे, चौथा जयश्री राजेंद्र पाटील, पाचवा ईशा शिवविशाल मिश्रा, सहावा प्रिया पद्माकर तायडे आदींनी बहुमान मिळवला.

प्रताप विद्यामंदिर चोपडा येथे कृषिकन्या कविता वाणी यांचा सत्कार

प्रतिनिधी । चोपडा

येथील रहिवासी कविता वाणी यांच्या कृषी क्षेत्रात सातत्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीयस्तरावर दखल घेत नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय महिला किसान कार्यकर्ता संमेलनात त्यांचा सन्मान करण्यात आला.

देशभरातून कृषी क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान देणाऱ्या महिला शेतकरी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेला हा गौरव चोपडा शहरासह संपूर्ण जळगाव जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. त्यांच्या झालेल्या या गुणगौरवाची दखल घेत प्रताप विद्या मंदिर, चोपडा येथे कविता वाणी यांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. प्रताप विद्या मंदिर उच्च माध्यमिक विभाग आणि कृषी तंत्र महाविद्यालय चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात कविता वाणी यांनी विद्यार्थ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन केले. कविता वाणी यांनी शेती आणि शेतीसोबत पूरक व्यवसाय कसे करता येऊ शकतात याबद्दल त्यांचे स्वतःचे अनुभव सांगितले. आज कृषी क्षेत्रात वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान, नैसर्गिक व जैविक शेती, देशी बियाणांचे संवर्धन, पशुपालन व दुग्ध व्यवसाय अन्नप्रक्रिया यासारखे कृषी पूरक उद्योगांचे महत्व त्यांनी सांगितले. गीर गाईच्या दुधापासून तूप तयार करणे, सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून विविध प्रकारच्या शेतमालाचे ऑनलाइन पद्धतीने जसे मेझॉन, फ्लिपकार्ट, झोमॅटो सारख्या ॲपच्या माध्यमातून विक्री करणे यासारखे अनुभव त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाला चोपडा एज्युकेशन सोसायटीच्या सचिव माधुरी मयूर, संस्थेचे समन्वयक गोविंदभाई गुजराथी, प्रशाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी पाटील, उपमुख्याध्यापक ए.एन.भट, उच्च माध्यमिक विभागाचे उपप्राचार्य जे.एस.शेलार, पर्यवेक्षक पंकज नागपुरे हजर होते. आभार एम. जे. पाटील यांनी मानले.

संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी पिंपळे नाल्यावर कठडे बसविण्याची मागणी

प्रतिनिधी । अमळनेर

अमळनेर येथील पिंपळे नाल्यावर संरक्षक कठडे नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या नाल्यात यापूर्वी घडलेल्या दुर्घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

नुकतेच भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष राहुल चौधरी यांचा अपघात झाल्याची घटना घडली होती. तसेच यापूर्वी एका पोलीस कॉन्स्टेबलचा नाल्यात पडून दुर्दैवी मृत्यू झाला होता. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या प्रभाग क्रमांक ८ ब मधील नगरसेविका अपूर्वा जालिंदर चौधरी यांनी अमळनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदन देऊन पिंपळे नाल्यावर तातडीने संरक्षक कठडे बसविण्याची मागणी केली आहे.

नाल्यावर कठडे नसल्यामुळे विशेषतः रात्रीच्या वेळी या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना व वाहनचालकांना अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. भविष्यात कोणतीही जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने संरक्षक कठडे बसवावेत, अशी मागणी प्रभाग क्रमांक ८ ब च्या नगरसेविका अपूर्वा चौधरी यांनी केली आहे.

ग.स.बँकेच्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन पोर्टल सुरू करण्याची मागणी

प्रतिनिधी । चोपडा

गव्हर्मेंट सर्व्हन्टस अर्थात ग, स. बँक कर्मचाऱ्यांसाठीचे संगणकीकृत पेन्शन पोर्टल फक्त काही काळासाठी सुरू झाले होते. त्यात अनेक कर्मचाऱ्यांना लाभ मिळालेला नाही.

काही कर्मचारी अनुभिज्ञ राहिले, काही कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला. परिणामी वंचितांसाठी पुन्हा हे पोर्टल सुरू करण्यात यावे, अशी मागणी चोपड्यातून होत आहे. चोपडा.ग.स. शाखेत मागील चार महिन्याच्या काळात अनेक कर्मचारी निवृत्त झाले. त्यात काही शाखाधिकारी देखील होते, अशा कर्मचाऱ्यांचे पेन्शन, (भविष्य निर्वाह निधी,) समान पद्धतीने वाटप करण्यात यावे, यासाठीचे पोर्टल महाराष्ट्र शासनाने पुन्हा सुरू करावे व वंचित कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी संजय उत्तमराव पाटील व सहकारी यांनी केली आहे.

जिल्हा बँक पंचवार्षिक निवडणुकीसाठी प्रफुल्ल पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

प्रतिनिधी । अमळनेर

जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी सोसायटी मतदारसंघातून अमळनेर तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती प्रफुल्ल हिरालाल पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

जिल्हा बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध मतदारसंघांतून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अमळनेर तालुक्यातून प्रफुल्ल पवार यांनी सोसायटी मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने सहकार क्षेत्रातील निवडणुकीच्या घडामोडींना महत्त्व प्राप्त झाले आहे.

अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती म्हणून त्यांनी काम पाहिले असून, सहकार क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

या उमेदवारीमुळे अमळनेर तालुक्यातील जिल्हा बँकेच्या निवडणुकीकडे सहकार क्षेत्रातील पदाधिकारी व सभासदांचे लक्ष लागले आहे.

दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांची कंदील व पणत्या बनविण्याची कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

दिवाळी सणाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोहाडी येथे विद्यार्थ्यांसाठी कंदील बनविणे व पणत्या तयार करण्याची अभिनव कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेला व सर्जनशीलतेला कलात्मक रूप दिले. स्वतःच्या हातांनी आकर्षक कंदील व सुंदर पणत्या तयार करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता. या उपक्रमासाठी उपक्रमप्रमुख गणेश बागुल, सुरेखा जोशी, भारती शिंपी, टीना सोनवणे व कविता चव्हाण या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना नवनवीन कलाकृती तयार करण्याची संधी मिळाली. या उपक्रमाला शिरसोली केंद्राच्या केंद्रसमन्वयक माधवी वाघ यांनी सदिच्छा भेट दिली. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या कलाकृतींचे त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच शाळेने राबविलेल्या या नाविन्यपूर्ण व आनंददायी उपक्रमाचेही अभिनंदन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो, सर्जनशीलता विकसित होते, स्वावलंबनाची भावना निर्माण होते.

विभागीय शालेय बांबू उडी स्पर्धेत किनोदच्या सि.रा.चौधरी हायस्कूलच्या शिवाजी भिलालाचे यश

प्रतिनिधी । चोपडा

नाशिक येथे आज झालेल्या विभागीय क्रीडा स्पर्धेत किनोदच्या सि. रा.चौधरी हायस्कूलचा विद्यार्थी शिवाजी भिलाला याने बांबू उडी स्पर्धेत १७ वर्षांखालील गटात तृतीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले.

विशेष म्हणजे, बांबू उडीसारख्या क्रीडा प्रकारासाठी आवश्यक असणारा महागडा व आधुनिक बांबू उपलब्ध नसतानाही, साध्या पारंपरिक बांबूच्या सहाय्याने शिवाजीने हे यश मिळवले.

मर्यादित साधनसामग्री, जिद्द, मेहनत आणि सरावाच्या जोरावर मिळवलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे. शिवाजीला क्रीडा शिक्षक क्षितिज संजीवकुमार सोनवणे यांचे मार्गदर्शन मिळाले.

साधने कमी असली तरी जिद्द मोठी असेल, तर यशाचा मार्ग नक्कीच सापडतो! हे शिवाजी भिलाला या ग्रामीण भागातील वाडा वस्तीत राहणाऱ्या विद्यार्थ्याने सिद्ध केले.

शिवाजीच्या या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

विनातिकीट प्रवास : ३३१ फुकट्यांकडून तीन लाखांचा दंड वसूल

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर भुसावळ विभागातील आठ प्रमुख स्थानकांवर फोर्ट्रेस तिकीट तपासणी मोहीम

प्रतिनिधी । भुसावळ

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर रेल्वे गाड्यांमध्ये प्रवाशांची गर्दी वाढत असताना विनातिकीट आणि अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविली आहे.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) पुनीत अग्रवाल यांच्या सूचनेनुसार आणि वरिष्ठ वाणिज्य प्रबंधक अजय कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्रमुख स्थानकांवर तपासणी मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. याच अनुषंगाने २८ ऑक्टोबर रोजी राबविण्यात आलेल्या फोर्ट्रेस तिकीट तपासणी मोहिमेत तिकीटविषयक ३३१ प्रकरणांमध्ये कारवाई करून तीन लाख सात हजार ६२५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. दिवाळीच्या सुट्यांमुळे प्रवाशांची ये-जा वाढली आहे. अनेक रेल्वे गाड्यांमध्ये गर्दी होत असून अशा परिस्थितीत प्रवाशांना सुरक्षित, सोयीस्कर आणि आरामदायी प्रवास उपलब्ध करून देण्यासोबतच विनातिकीट प्रवास, अनियमित तिकीट आणि विनाबुक केलेल्या सामानाच्या प्रकारांना प्रतिबंध घालण्यावर रेल्वे प्रशासनाने लक्ष केंद्रीत केले आहे. दि. २८ ऑक्टोबर रोजी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत भुसावळ, जळगाव, नाशिक रोड, मनमाड, खंडवा, अकोला, बडनेरा आणि अमरावती या आठ प्रमुख रेल्वे स्थानकांचा समावेश होता. या मोहिमेत मुख्य वाणिज्य निरीक्षक, पर्यवेक्षक, तिकीट तपासणी कर्मचारी आणि रेल्वे सुरक्षा दलाचे जवान सहभागी झाले होते. तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित तिकीट आणि विनाबुक केलेले सामान अशा प्रकारांत ३३१ प्रकरणे आढळून आली. या प्रकरणांतून ३ लाख ७ हजार ६२५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

तिकीट तपासणीसोबतच रेल्वे कायद्याच्या विविध कलमांनुसारही कारवाई करण्यात आली. अस्वच्छता पसरविल्याच्या एका प्रकरणात एक हजार रुपये, रेल्वेच्या मालमत्तेवर अनधिकृत प्रवेश केल्याच्या १८ प्रकरणांत नऊ हजार रुपये, अनधिकृत विक्रीच्या एका प्रकरणात दोन हजार रुपये आणि धूम्रपानाच्या एका प्रकरणात ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला. या चार प्रकारांतील एकूण २१ प्रकरणांतून १२ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल झाला.

कुवे निमझरी विकासो चेअरमनपदी रमाबाई गुजर

प्रतिनिधी । चोपडा

कुवे निमझरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी रमाबाई श्रीराम गुजर यांची तर व्हाईस चेअरमनपदी धुळाबाई पौलाद गुजर यांची सर्वां नुमते निवड करण्यात आली आहे.

या संचालक मंडळात सुभाष गुजर, दिलीप राजपूत, निलाचंद गुजर, प्रल्हाद चौधरी, दिनेश पाटील, दगडू कोळी, कोमल सिंग राजपूत, राजेंद्र गुजर, ज्ञानेश्वर मराठे, कमलबाई निकुंबे यांची निवड करण्यात आली आहे. रमाबाई गुजर यांच्या निवडीचे पंचायत समितीचे माजी सदस्य छगनबापू पाटील, निम झरी परिसरातील मान्यवरांनी कौतुक केले आहे. रमाबाई पाटील या आडगाव येथील माहेरवाशीन असून मंगल गणपत पाटील यांच्या त्या सुकन्या व कवी लेखक साहित्यिक रमेश पाटील यांच्या पुतणी होत.